



# पारनेर दर्शन






वर्ष ३ अंक ५, शुक्रवार १५ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# प्रवरेची धुणी धुणारे उमेदवार नकोत आम्हाला!

## ■ काशिनाथ दाते यांच्या होम ग्राऊंडवर सक्षणा सलगर यांची फटकेबाजी ■ टाकळी ढोकेश्वर येथे राणी लंके यांची प्रचाराची सभा ■ अनेकांचे राष्ट्रवादीत प्रवेश

पोखरी : विशेष प्रतिनिधी

**प्रवरेची धुणी धुणारी लोक नको आहेत आम्हाला.चमचेगिरी करणारे उमेदवार नकोत आम्हाला. लोकांत राबणारा, लोकांचे प्रश्न सोडविणारा माणूस हवा आहे असे सांगतानाच या भागाने लोकसभेला जो हबाडा दिलेला आहे त्याची पुनरावृत्ती विधानसभेला झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा सक्षणा सलगर यांनी व्यक्त केला.**

महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारार्थ टाकळी ढोकेश्वर गटातील प्रचाराचा नारळ पोखरी येथे फोडण्यात आला. त्यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना सलगर यांनी विरोधकांवर टीकास्त्र सोडले. यावेळी खा. नीलेश लंके उमेदवार राणी लंके यांच्यासह गटातील २२ पैकी १७ गावांचे सरपंच उपस्थित होते.

यावेळी बोलताना सलगर म्हणाल्या, लंके दाम्पत्याची लोकप्रियता ही उपस्थितांच्या प्रेमाचं संचित आहे. दिल्लीतही विचारले जाते सत्तर वर्षांच्या सत्तेला कोणी सुरूंग लावला ? काय त्यांचे संसदेतील भाषण राणीताई ? असे इंग्रजी भाषण महाराष्ट्रातील कोणत्याच खासदाराला येणार नाही. त्यांच्या भाषणाची सुरूवात ज्यावेळी दुरचित्रवाणीवरून ऐकली त्यावेळी मराठी मुलगी म्हणून मला अभिमान वाटला.

ज्यांच्या घरात राजकारणाचा वारसा नाही, एका सामान्य घरातील तरूण प्रवरानगरला हबाडा देऊन दिल्लीच्या संसदेत पोहचला ही लोकशाहीची ताकद आहे. त्यामुळेच मी वारंवार या भागात येते असते असे सलगर म्हणाल्या.

यावेळी माधवराव लामखडे, विकास रोहोकले, मारूतीराव रेपाळे, सुवर्णा धाडगे, राजू चौधरी, बापू शिर्के, बाळासाहेब खिलारी, श्रीरंग रोकडे, शशिकांत आंधळे, सतीश पवार, संजय काशिद, कैलास गागरे, मनोज शिंदे, पियुष गाजरे, संदीप चौधरी, अभिजित झावरे, शंकरदादा कासोटे, बापू ठुबे, संतोष वाळुंज, अशोक आहेर, राजू रोकडे, अनिल शिंदे, प्रशांत झावरे, अशोक वाळुंज, दत्ता ठाणगे, बाबासाहेब नऱ्हे, शोभा शिंदे, सचिन भोर, अमोल उगले, शरद झावरे, सोमनाथ आहेर, पोपट गुंड, दत्तात्रय निवडूंगे, अजित भाईक, रविंद्र राजदेव, डॉ. आग्रे, नितीन ढोकळे, अशोक घुले, रवी गायके, सचिन गोडसे, गंगाराम बेलकर, शिवाजी बेलकर, साहेबराव चिकणे, संदीप गुंजाळ, संतोष हांडे, ज्ञानेश्वर गुंजाळ उपस्थित होते.



■ महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या होम ग्राऊंडवर सक्षणा सलगर यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारार्थ जोरदार फटकेबाजी केली.

### लोकसभेला मोठी ताकद चितपट केली

बरेच लोक एका घरात दोन उमेदवारीबाबत बोलतात. आरे आमचे काम बोलते ना. आम्ही २४ तास काम करतो. कामाला महत्व आहे. तुम्ही काम करा. आज भुछत्रासारखे उगवले आणि आमच्यावर आरोप करत आहेत. कुणाच्या उन्नीस बीस डोक्यात असेल ना त्यांना गावे सापडेपर्यंत निवडणूक संपून जाईल. उमेदवाराला स्वतःच्या गावातच फिरण्याची वेळ आली तर ते काय निवडणूक लढविणार आहेत ? बुक्क्याच्या नादी लागू नका गुलालाच्या बाजूने या. लोकसभेला फार मोठी ताकद आहेत त्यांना चितपट केले हा तर फार छोटा विषय आहे.

खा. नीलेश लंके

### दिड हजार रूपये प्रतिष्ठा आदर राखू शकत नाहीत

इथे बसलेल्या प्रत्येक महिलेला राणीताई हव्या, हव्याशा वाटतात कारण त्या तुमच्यासारख्या वागतात. नुसते हाय हॅलो बाय मागून गुड बाय असा उमेदवार नको आपल्याला. राणी लंके पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या सदस्या होत्या. त्यांनी दहा वर्षे काम केले. पुढे पुढे केले म्हणून कर्तबगारी झाली का ? इथे बसलेल्या सर्व महिला कर्तबगार आहेत. लाडक्या बहिण योजनेचे दिड हजार रूपये कोणत्याही लाडक्या बहिणीची प्रतिष्ठा किंवा आदर राखू शकत नसल्याचे सक्षणा सलगर यांनी सांगितले.

### राणी लंके तुम्ही नशिबवान !

राणी लंके या खूप नशिबवान आहेत. इतकी जीवाभावाची माणसं तुमच्या गाठीशी आहेत याला भाग्य लागतं. इथला प्रत्येक माणूस बोलताना तो स्वतः उमेदवार आहे असे बोलत होते. मला हेवा वाटला असे माणसं माझ्या मतदारसंघात असती तर किती बरं झाले असते. राणी लंके उमेदवार नाहीत तर या मतदारसंघाच्या घरातील प्रत्येक माणूस उमेदवार आहे असे इथेल वातावरण आहे. हे प्रेम पैसे देऊन मिळत नाही, त्याला माणसं कमवावी लागतात.

सक्षणा सलगर
प्रदेशाध्यक्षा, राष्ट्रवादी युवती काँग्रेस

### हीच लोकशाहीची खरी ताकद

वसंतदादा पाटील यांचे शिक्षण चौथी होते. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर त्यांनी महाराष्ट्राचा गाडा यशस्वीपणे हाकला. एक घरामध्ये स्वयंपाक करणारी महिला विधानसभेची उमेदवार आहे की लोकशाहीची खरी ताकद आहे. शेताच्या बांधावर बसलेल्या एखाद्या फाटक्या शेतकऱ्याला जे ज्ञान असते ते पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यालाही नसते. मी ज्या मतदारसंघात फिरते, त्या भागातील भाषेत, त्या स्टाईलमध्ये बोलावं लागतं. ज्याला प्रेमाची भाषा त्याला प्रेमाची भाषा. ज्याला कळत नाही त्याला हबाडा देण्याची स्टाईल आमच्याकडे आहे. असे सांगत सलगर यांनी विरोधकांना सुनावले.

### लोकसभेची पुनरावृत्ती होणार

या विधानसभा निवडणूकीमध्ये लोकांचे प्रश्न सोडविणारे सक्षम नेतृत्व, लोकांच्या अडीअडचणींना साथ देणारं, लोकांना आपलसं वाटणारं, नेतृत्व विधानसभेत पाठवायचं आहे. प्रवरेचं धुणं धुणारं नेतृत्व नको. एका तरूणीने या सभेत आपल्या भाषणात सांगितले. तीला कळाले तर तुम्हालाही कळाले असेल. चमचेगिरी करणारे उमेदवार होऊ शकत नाहीत. लोकांचे प्रश्न सोडविणारा माणूस लागतो. मला खात्री आहे या भागाने लोकसभेला जो हबाडा दिला आहे त्याची पुनरावृत्ती या निवडणूकीतही होणार असल्याचे सलगर यांनी सांगितले.

### बयालाच उमेदवारी देऊन टाकलीय !

पाच वर्षात मोठया प्रमाणावर विकास कामे केली. काही कामे राहीली असतील तर तीही पुढील काळात मार्गी लागणार आहेत. आता आपल्याकडे डबल इंजिन असणार आहे. त्यामुळे सापट राहिलेली नाही. केंद्राचं काम असले तर मी आहेच आणि राज्याच्या कामासाठी बयालाच उमेदवारी देऊन टाकलीय ! खा. लंके यांनी हे सांगताच उपस्थितामध्ये हास्यकल्लोळ झाला.

### २४ ऑक्टोबरलाच तुतारी वाजली !

२४ तारखेला अर्ज भरण्यासाठी लाडक्या बहिणी आल्या होत्या. त्याच दिवशी पारनेरला तुतारी वाजली. फक्त त्यांच लिड किती यासाठी ही प्रचारसभा आहे. खा. नीलेश लंके हे अखंडपणे सामान्य जनतेच्या कामसाठी व्यस्त असतात. त्यामुळेच राणी लंके यांच्या अर्ज दाखल करण्यासाठीची सभा ऐतिहासिक झाली. टाकळी गटात राणी लंके या मोठे मताधिक्य घेऊन विजयी होणार यात शंका नसल्याने याच सभेत सरपंचांनी कामाची मागणी केली इतका आत्मविश्वास या गटातील कार्यकर्त्यांना आहे.

गंगाराम बेलकर
मा. सभापती

### लंके परिवाराचे भाग्य

एक नणंद अर्ज भरण्यासाठी तर दुसरी प्रचार सभेसाठी आलीय हे आमच्या लंके परिवाराचे भाग्य आहे. सर्वजण लाडकी बहिण योजनेवर बोलत आहेत.महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर दरमहा तीन लाख रूपये देण्यात येणार आहेत.

राणी लंके
महाविकास आघाडीच्या उमेदवार

### होम ग्राउंडवरची लढाई अवघड नाही

निवडणूकीची लढाई लढण्यासाठी हजारो निष्ठावान हवे असतात. ते नीलेश लंके यांच्याकडे आहेत. निष्ठावान सहकारी एकजीवाचे आहेत. नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांमध्ये विश्वास आहे. लढाई किती मोठी की छोटी हे पाहत नाही. लोकसभेची मोठी लढाई जिंकली आता होमग्राउंडवरची लढाई जिंकणे काय अवघड आहे. लोकसभेला सगळे मावळे तालुक्याबाहेर होते, तरीही ४० हजारांनी आघाडी घेतली, आता तर सगळे तालुक्यातच आहेत.

राजेंद्र चौधरी
मा. पंचायत समिती सदस्य

### वातावरण फिरलंय, तुतारीने घेरलंय

आजची ही निवडणूक गददाराला गाडून खुद्दाराला गुलाल लावण्याची आहे. ८४ वर्षांचे पवार साहेब सभा घेत आहेत. त्यांना मुख्यमंत्री व्हायचे नाही. महाराष्ट्राची अस्मिता राखून महाराष्ट्राला त्यांना प्रगतीपथावर न्यायचे आहे. या महाराष्ट्रात आम्ही गुजरात्यांचे राज्य येऊ देणार नाही. महाराष्ट्राची अस्मिता गुजरात चालवू शकत नाही. हा छत्रपतींचा महाराष्ट्र आहे. महाराष्ट्राची अस्मिता म्हणून स्वाभिमानाने मतदान करा. वातावरण फिरलंय, तुतारीने घेरलंय असे सांगत सलगर यांनी राणी लंके यांना मतदान करण्याचे आवाहन केले.

### यांनी केले प्रवेश

खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीमध्ये पोखरीचे सरपंच सतिश पवार, वारणवाडीचे सरपंच संजय काशिद, देसवडयाचे उपसरपंच सचिन भोर, ग्रा पं सदस्य राहुल मधे, म्हाताजी पवार, रोहिदास शिंदे, रेवण पवार, मुनावर सय्यद, दत्ता वाकळे, आशाबाई दरेकर यांच्यासह समर्थकांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.

### २२ पैकी १७ सरपंच आमच्यासोबत

बाबासाहेब तांबे, विकास रोहोकले, माधवराव लामखडे हे तीन ॲटमबॉम नेते नीलेश लंके यांच्यासमवेत आल्याने विरोधी उमेदवाराचे कार्यकर्ते आमचे कसे होणार अशी चर्चा करू लागले आहेत. विरोधी उमेदवार जिथे होते तिथे त्यांनी कोणाचेच खरे केले नाही त्यामुळे त्यांच्यावर ही वेळ आली आहे. ते जिल्हा परिषदेचे सदस्य स्वतःच्या ताकदीवर कधीही झाले आम्ही त्यांना साथ दिली म्हणून ते या पदावर गेले. या गटातील १७ ग्रामपंचायतची सत्ता नीलेश लंके यांच्या विचाराबरोबर आहेत.

बापू शिर्के
उपसभापती, बाजार समिती

### ते आम्हाला सुसंस्कृतपणा शिकवताहेत

आज विधानसभा निवडणूकीमध्ये जे विरोधी उमेदवार आहेत. त्यांच्यासाठी आम्ही इतरांशी भांडणे केली. नांदूरपठारमध्ये त्यांचा बॅनर फाडल्याचे सांगण्यात आले. त्यांच्या बॅनरकडे पहायला सुध्दा आम्हाला वेळ नाही. आम्ही आमच्या प्रचारात व्यस्त आहोत. दुसरीकडे ते आम्हाला सुसंस्कृतपणा शिकवत आहेत. नांदूरपठार गाव लोकसभेप्रमाणेच विधानसभेच्या निवडणूकीतही राणी लंके यांना भरघोस मताधिक्य देणार आहे.

रविंद्र राजदेव
मा. सरपंच नांदूरपठार

### टाकळी गट सर्वाधिक लिड देणार

पावणेसात हजार मतांचे लिड लोकसभेला दिले. गेल्या विधानसभेलाही गटाने नीलेश लंके यांना लिड दिले. या निवडणूकीत सर्वाधिक मताधिक्य देण्याचा निर्धार या गटातील मतदारांनी केला असून या सभेची गर्दी त्याची साक्ष देत आहे. राणीताई यांना एक लाखांच्या मताधिक्क्याने विधानसभेत पाठवायचे आहे.

मोहन रोकडे

### हे कसले सुसंस्कृत ?

खासदारांनी सर्वांना संयमाची शिकवण दिली आहे. आता मात्र शिकार सापडली आहे. सुसंस्कृत चेहरा म्हणून विरोधक काय प्रचार करता ? नीलेश लंके यांच्या घरी जाऊन पहा, सुसंस्कृतपणा काय असतो. विरोधी उमेदवाराच्या घरी कधी पिण्याच्या पाण्याचा ग्लास मिळाला का कोणाला ? हे कसले सुसंस्कृत ?

सचिन गोडसे
सावरगांव

### आमच्या गावचे भुमिपुत्र विकास पुरूष!

पोखरी गावामध्ये सातत्याने सांगितले जाते की गावचा माणूस आहे म्हणून मतदान केले पाहिजे. आमच्या तीन ग्रामपंचायत मिळून एक सोसायटी आहे. ४५ वर्षे सोसायटी अस्तित्वात आहे. तीनदा कर्जमाफी मिळाली आहे. ती विरोधी उमेदवारांच्या ताब्यात आहे. बँकांचे ठरावही त्यांच्याच सहमतीने होतात. शोकांतिका ही आहे ही की या सोसायटीचे कार्यालय खडकवाडी येथे आहे. असे विकास पुरूष या गावाचे भुमिपुत्र आहेत. पोखरी, वारणवाडी, म्हसोबा झाप या तीनही गावांचे सरपंच या व्यासपीठावर आहेत. येत्या काही दिवसांत खा. लंके यांच्या माध्यमातून सोसायटीचे कार्यालय गावामध्ये येईल. मतदारांनी भावनिक न होता राणी लंके यांना मतदान करायचे आहे.

सिताराम पवार, पोखरी

### महायुतीने भांडणे लावली

कांद्याला आज भाव आला आहे. आपल्याकडे कांदा नाही. भाव साठ रूपये आहे. व्यापाऱ्यांकडे कांद्याचा साठा आहे. आज तेलाच्या डब्याचा काय भाव आहे ? मग लाडकी बहिण योजनेचा काय उपयोग ?आज धर्मा-धर्मामध्ये वाद लावला जात आहे. आपल्या राज्यात कोणी परराज्याची व्यक्ति आली तर आपण त्यांना सामाऊन घेतो गुजरातमध्ये गेल्यावर तिथे आपल्याला काय सन्मान मिळतो ? याचा विचार करा. आपण महायुतीला का मत द्यायचे याचा विचार करून राणी लंके यांना भरभरून मते द्या.

भाउसाहेब कोकाटे
वारणवाडी

### म्हणून खा. लंके हे लोकसभेत

यशवंतराव चव्हाण सांगत की, कार्यकर्ता आंधळा असून चालत नाही आंधळयाच्या मागे दुनिया फिरू शकत नाही. मात्र आंधळा दुनियाभर फिरू शकतो. आपल्या सोबतच्या समाजाला कुठे न्यायचे ते समजते तो कार्यकर्ता. गेल्या पंचवीस वर्षापासून ज्या नीलेश लंके यांनी ही भूमिका निभावली. त्यामुळेच ते आज लोकसभेत आहेत. राणीताई लंके विधानसभेत जाणार आहेत.

पोपट गुंड
काताळवेढा

### कुठे गेला भगवा ?

विरोधी उमेदवार सांगत होते की टाकळी ढोकेश्वर गट माझा बालकिल्ला आहे. हा गट कुणाची मत्तेदारी नसून हा गट खा. नीलेश लंके यांचा आहे. कोणी उराला वाळू लाउन बोलण्याचे कारण नाही. २०१९ पूवी याच मंदिरात शिवसेनेची सभा झाली त्यावेळी विरोधी उमेदवाराने माझ्या अखेरपर्यंत मी सेनेचा भगवा सोडणार नाही. माझ्या मृत्यूनंतर मला भगव्यात गुंडाळा असे सांगितले होते. आता कुठे गेला भगवा ? स्वतःच्या स्वार्थासाठी पन्नास पक्ष बदलणारे राणी लंके यांच्यावर काय टीका करता असा सवाल करत पोपट गुंड यांनी काशिनाथ दाते यांचे नाव न घेता टिकास्त्र सोडले.




फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

# ‘टर्टल नेक’ फॅशन

**थोडीशी थंडी सुरू होताच फॅशनप्रेमी युवती, महिला खास हिवाळ्यात घालण्यासाठीचे कपडे आणि ॲक्सेसरीज् कधी आणि कशा वापरता येतील याचा विचार करून ठेवतात. अशीच आवर्जून हिवाळ्यात घातल्या जाणाऱ्या टी-शर्ट किंवा स्वेटरची फॅशन म्हणजे ‘टर्टल नेक’.**




या फॅशनला ‘टर्टल नेक’ का म्हणतात याचं उत्तरही त्याच्या नावातच आहे. गळ्यापाशी पुंगळीसारखी रचना असलेल्या- अर्थात ‘ट्युब्युलर नेकलाईन’ची दोन नावं तुम्ही कदाचित ऐकली असतील. ‘पोलो नेक’ आणि ‘टर्टल नेक’. मजा म्हणजे या दोन्ही फॅशन्स साधारण एकसारख्याच असतात. अमेरिकेत त्याला ‘टर्टल नेक’ म्हणतात, तर युनायटेड किंग्डममध्ये ‘पोलो नेक’ (इथे ‘पोलो नेक’ ही गळ्याची फॅशन आणि ‘पोलो शर्ट’ हा टी-शर्ट या फॅशन्सची गल्लत करू नका बरं! कारण त्या दोन्हीत मात्र काहीच साम्य नाही.) आपल्याकडे ट्युब्युलर नेकलाईनसाठी टर्टल नेक हेच नाव आता रूढ झालं आहे. या फॅशनमध्ये गळा आणि मान झाकली जात असल्यानं कासवानं मान कवचाच्या आत घ्यावी आणि बाहेर काढावी, ती उपमा त्याला देण्यात आली आहे.

## मटेरियल

सर्वसाधारणपणे टर्टल नेक हे स्वेटरच्या कापडात म्हणजे वूलन, विणलेल्या कापडात पुलोव्हर प्रकारात मिळतात. परंतु आपल्याला थंडीत प्रत्येक वेळी स्वेटरची गरज भासेलच असं नाही, त्यामुळे थोड्याशा थंडीत वापरायची असेल तर पॉलिस्टरच्या, लांब बाह्यांच्या टर्टलनेक पुलोव्हर टी-शर्टच्या रूपात ही फॅशन परिधान करता येते. हे पॉलिस्टरचं मटेरिअल वूलन फील देणारं, काहीसं उबदार आणि ‘रिब्ड टेक्स्चर’ असलेलं असतं.

## अशी करता येईल टर्टल नेकची फॅशन

संध्याकाळी किंवा रात्री फिरायला जाताना, प्रवास करताना टर्टल नेक टी-शर्ट किंवा स्वेटर छान मिरवता येतात. हल्ली स्लीव्हलेस टर्टल नेक टी-शर्ट्स आणि स्लीव्हलेस टर्टल नेक क्रॉपटॉप्सचीही चलती दिसते आहे. स्लीव्हलेस असल्यानं त्यांचा थंडीच्या दृष्टीनं काही उपयोग होत नाही, परंतु ते ‘यंग’ आणि ‘कॅज्युअल’ लूक देत असल्यानं मुलींची त्यांना पसंती दिसते. लांब बाह्यांचे टर्टल नेक टी-शर्ट वा स्वेटर साध्या जीन्सवर छान दिसतातच, पण आणखी काही पद्धतीनं त्यांची फॅशन करायची असेल, तर त्याबद्दल वेगवेगळ्या फॅशनतज्ज्ञांनी काय सांगून ठेवलंय, ते पाहू या...



- ऑफिसवेअरसाठी : ट्राऊझर आणि त्याला सूट होणारं फॉर्मल जॅकेट किंवा ब्लेझर याबरोबर टर्टल नेक टी-शर्ट खूप छान दिसतो. हल्ली अनेक क्षेत्रांमध्ये ऑफिसेसमध्ये कायम ‘फॉर्मल’च कपडे वापरायला हवेत असा नियम नसतो. तिथे डेनिमचे कपडेही वापरले जातात. अशा वेळी रोजच्या जीन्सबरोबर टर्टल नेक टी-शर्ट घालून त्यावर डेनिमचं किंवा इतर कुठलंही कम्फर्टेबल जॅकेट घालून लूक पूर्ण करता येईल.
- ‘कॅज्युअल वेअर’साठी : गुडघ्यापर्यंतच्या किंवा मिडी वा मिनी स्कर्टवरही टर्टल नेक छान दिसतो. यात स्कर्ट जर ‘फ्लेअर्ड’ प्रकारचा असेल, तर वरचा टर्टल नेक अंगाबरोबर बसणारा असावा, असं बहुतेक फॅशनतज्ज्ञ सुचवतात. स्कर्ट घट्ट फिटिंगचा किंवा अंगाबरोबर बसणारा म्हणजे ‘ए-लाईन’ किंवा ‘पेन्सिल’ स्कर्ट असेल, तर टर्टल नेक थोडा ‘ओव्हरसाईज्ड’ म्हणजे घोळदार चांगला दिसेल, असं सांगितलं जातं. जीन्सवर टर्टल नेक टी-शर्ट ‘इन’ करून त्यावर थंडीसाठीचा ओव्हरसाईज्ड कोट घालणंही फॅशनमध्ये आहे. टर्टल नेकची थोडी ‘अनयूज्वल’ अशी फॅशन हल्ली दिसते, त्यात जीन्सवर टर्टलनेक घालून त्यावर आणखी एक पूर्ण बाह्यांचा, कॉलरचा कॉटन शर्ट घातलेला असतो. यात टर्टल नेकचा केवळ नेकच वर घातलेल्या शर्टमधून दिसून येतो. ही फॅशन ऐकायला जरा विचित्र वाटली, तरी ती काही सेलिब्रिटी लोकांकडून केलेली बघायला मिळाली आहे. कदाचित परदेशातल्या अती थंडीवरचा हा फॅशनेबल उपाय असावा.

# कुडकुडीत फॅशन

**फॅशन इंडस्ट्री ही अथांग आहे. त्याला आजच्या काळात कसलीही सीमा, परिसीमा राहिलेली नाही. दिवसागणिक, ऋतुगणिक, माणसागणिक फॅशन बदलत राहते. याचे मूळ कारण आजची तरुण पिढी. त्यांच्यासाठी आणि त्यांच्या मते प्रत्येक क्षणाची फॅशन वेगळी असू शकते. हिवाळा म्हटलं की फॅशनचं परिमाण पूर्णपणे बदलतं, पण हिवाळ्यातील फॅशन सगळ्यात स्मार्ट दिसते अशी आजच्या तरुणाईची धारणा आहे. हिवाळ्यातील फॅशन ट्रेण्ड्सचा घेतलेला हा आढावा**

## डेनिम जॅकेट्स

हिवाळ्यात जरा लूज कपडे घालायला तरुणाईला आवडतं. डेनिम जॅकेट्स हा या मौसमातील सगळ्यात ट्रेण्डी प्रकार आहे. ते घातल्यावर अतिशय स्मार्ट लूक येतो. हिवाळ्यात कॅज्यूअल कपड्यांबरोबर डेनिम जॅकेट परिधान केलं जाऊ शकतं. डेनिम जॅकेट हे ट्रेण्डी वुलन क्रॉप टॉप तसंच टी शर्टबरोबर ट्राय करता येतं. तुम्हाला हव्या त्या साईजमध्ये डेनिम जॅकेट्स मिळू शकतात. शॉर्ट, लॉन्ग, हाफ, फुल, स्लीव्हलेस असे विविध प्रकार आणि रंग आता डेनिममध्ये उपलब्ध आहेत. डेनिमचे जम्पसूटसुद्धा हिवाळ्यात छान दिसतात. छोटीशी ट्रिप, एक दिवसाची पिकनिक किंवा अगदी ऑफिसच्या कॅज्यूअल वेअरसाठी डेनिम जम्पसूट हा उत्तम पर्याय आहे. तुम्हाला इनफॉर्मल, आरामशीर लूक हवा असेल किंवा तुमच्या नेहमीच्या लूकपेक्षा अधिक स्टायलिश आणि लक्षवेधी लूक करायचा असेल तर थंडीच्या दिवसांत डेनिम जॅकेट तुमच्या वॉर्डरोबमध्ये एक अष्टपैलू जोड ठरू शकते. डेनिम हा पाश्चात्त्य संस्कृतीतून आपल्याकडे आलेला प्रकार आहे, पण सध्या भारतातली त्याची लोकप्रियता, आवड आणि वापर इतर कुठल्याही देशांपेक्षा जास्त आहे.

## स्वेट शर्ट्स

हा प्रकारसुद्धा थंडीच्या दिवसांत फार स्मार्ट आणि कुल दिसतो. खरंतर स्वेट शर्ट घालायची सुरुवात नव्या पिढीतील मराठी-हिंदी सिनेतारकांनी केली आणि तेव्हापासून स्वेट शर्ट्सचा ट्रेण्ड दिवसेंदिवस वाढतो आहे. स्वेट शर्ट मुळात वूलन किंवा थोड्या जाड कापडाचे असतात, ज्याने थंडीत थोडी फार उब मिळते. स्वेट शर्ट हा प्रकारसुद्धा तुम्ही कुठल्याही निमित्ताने घालू शकता. त्यावर छान स्पोर्ट्स शूज आणि मुलींनी केसाची पोनी टेल बांधली की एकदम स्मार्ट लूक येतो. स्वेट शर्टमध्येही अनेक रंग आता पाहायला मिळतात, पण शक्यतो ब्लॅक, ब्ल्यू, व्हाइट असे रंग मुलं आणि मुली दोघांनाही स्मार्ट आणि खुलून दिसतात. स्वेटरच्या तुलनेत हे थोडे पातळ असते, त्यामुळे तुम्ही अगदी उन्हाळ्यातही स्वेट शर्ट्सचा पर्याय निवडू शकता.

## लेदर जॅकेट्स

हुडीज आणि लेदर जॅकेट्स हा प्रकारसुद्धा थंडीतला ट्रेण्डिंग प्रकार आहे. साध्या टी शर्ट्सवर किंवा अगदी कुठल्याही प्रकारच्या कपड्यांबरोबर तुम्ही जॅकेट्स पेअर करू शकता. लेदर जॅकेटची फॅशन कधीही कालबाह्य होत नाही. लेदर जॅकेट विंटर वार्डरोबमधील सर्वोत्तम स्टायलिश आऊटफिटपैकी एक आहे. डेनिम जॅकेट किंवा स्वेट शर्टपेक्षा हे जॅकेट थोडं जास्त महाग असतं, पण एखादं तरी जॅकेट तुमच्या स्टायलिश कपड्यांच्या कलेक्शनमध्ये असायला हवं. लेदर जॅकेट वापरताना थोड्या फार टिप्स फॉलो करणं गरजेचं आहे, जेणेकरून ते जास्त काळ टिकतं. लेदर जॅकेट प्राण्यांच्या कातडीपासून बनवलं जातं, त्यामुळे ते खरेदी करताना पूर्णपणे माहिती घेऊन आणि तपासून पहा. ते धुण्यासाठी कुठल्याही सोल्यूशनच्या पाण्यात भिजवून धुवा, मशीनमध्ये लेदर जॅकेट धुतलं तर लगेच खराब होऊ शकतं. जॅकेट परिधान करताना आणि कपाटात ठेवताना ते किंचितही ओलसर राहणार नाही याची काळजी घ्या. या जॅकेट्समध्येही वेगवेगळे प्रकार असतात जसं की ओपन झिप, लेदर बॉम्ब, पफर जॅकेट आणि अजून बरंच काही. एकेकाळी जॅकेट फक्त ठरावीक वर्गाची मक्तेदारी मानली जायची, परंतु आता सर्रास कोणीही वेगवेगळ्या पद्धतीने जॅकेट परिधान करू शकतं.





- थंडीतल्या फॅशनची गंमत म्हणजे मुलं-मुली, स्त्री-पुरुष सर्वांनाच सेम पद्धतीचे, स्टाइलचे कपडे वापरतात. कारण जॅकेट्स, हुडी, स्वेटर हे सगळंच कपड्यांच्या युनि-सेक्स प्रकारात येतात. विंटर फॅशनमध्ये अनेक प्रयोग करता येतात, असं तरुणाईचं म्हणणं आहे. हे कपडे कुठल्याही प्रकारे पेअर केले तरी खूप स्मार्ट आणि स्टायलिश दिसतात. आता आपण जरी फक्त कपड्यांबद्दल बोललो असलो तरी हिवाळयात शाली आणि स्कार्फ हेसुद्धा तरुणाईच्या कलेक्शनमध्ये पाहायला मिळतात. त्यांचं असं म्हणणं आहे की थंडीत तर ते उपयोगी पडतंच, पण स्कार्फ हा आता रोजच्या जगण्याचा एक भाग झाला आहे. थंडी, धुळ, वारा, ऊन कधीही स्कार्फ हा लागतोच. तरुण पिढी मुळातच शॉपोहोलिकच असल्याने आजकाल सगळ्यांकडेच शाली, कोट्स असे वेगवेगळे प्रकार पाहायला मिळतात.
- हिवाळ्यात फॅशनचं प्रमाण वाढण्याचं कारण म्हणजे तरुणाईची भटकंती. कुठेही फिरताना गरम कपडे (थर्मल्स) घेऊन फिरावं लागतं, त्यामुळे काही जण फक्त थर्मल्स आणि त्यावर जॅकेट्स पेअर करतात, तेही खूप छान दिसतं. तुम्ही जर उत्तरेकडे फिरायला जाणार असाल तर थंडीतल्या कपड्यांची खास तयारी करणं गरजेचं आहे. अंगात घालणाऱ्या कपड्यांबरोबरच कानटोपी, हात मोजे आणि गम बूट्स या बेसिक गोष्टी तुमच्याकडे असणं अतिशय महत्त्वाचं आहे. त्यामध्येही तुम्हाला हवे तसे प्रकार, फॅशन, स्टाइल मिळते. कुडकुडत्या थंडीत फॅशनेबल कपड्यांची हौसही भागवता येते आणि गुलाबी थंडीची मजाही घेता येते. त्यामुळे एकूणच सगळ्या ऋतूंमध्ये हिवाळ्यातील फॅशन तरुणाईला अधिक भावते.

## लॉन्ग कोट्स

लॉन्ग कोट्स पूर्वीच्या काळी स्त्रिया साडीवर परिधान करत असत. त्यानंतर हा प्रकार सिनेमातही बऱ्याचदा पाहायला मिळाला. पूर्वी स्त्रिया बऱ्याचदा महागड्या काश्मिरी पश्मिना कोट्सना अधिक पसंती द्यायच्या. आज त्यामध्येही वेगवेगळे प्रकार आले आहेत. परंतु, अशा पद्धतीचे कोट्स आणि जॅकेट्स यात बराच फरक जाणवतो. हे कोट्स जास्त करून व्हेल्वेट आणि पश्मिना प्रकारात उठावदार आणि राजेशाही दिसतात. आजही ती पद्धत विशिष्ट सामुदायांमध्ये प्रचलित आहे. परदेशात राहणारे, ये - जा करणारे आणि उत्तर भारतात राहणाऱ्यांकडे असे कोट्स हमखास पाहायला मिळतात. उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात मात्र याचा फार उपयोग होत नाही, त्यामुळे अगदी गरज असेल तरच हे कोट घ्यावेत.

## हिवाळ्यात ऑफिसला जाताना घाला हे कपडे

**हिवाळा म्हणजे कोणतीही फॅशन न करण्याचा ऋतू असे म्हटले तरी चालेल. कारण कोणतेही फॅशनेबल कपडे घातले तरीही त्यावर स्वेटर घालावेच लागते. सतत स्वेटर घातले तर सहकारी, मित्र चिडवतात. किंवा आजारी आहेस का असे विचारतात. बर हे ऐकायचे नसेल तर थंडीत एसीतही कुडकूडत बसावे लागेल.**

तुम्हाला माहिती नसेल पण हिवाळ्यात तुम्ही तुमच्या लुकवर अनेक प्रयोग करू शकता. जर तुम्हाला इंडो वेस्टर्न लूक आवडत असेल, तर काही मिक्स मॅचच्या मदतीने तुम्ही असा लुक करू शकता. जर तुम्हाला पूर्णपणे वेस्टर्न स्टाईल हवी असेल तर तेही करता येते. या सर्व लूकमुळे तुमचे संपूर्ण व्यक्तिमत्व तर स्टायलिश आणि मस्त होईलच, शिवाय तुम्ही थंडीपासूनही वाचाल. चला तर मग जाणून घेऊया तुम्ही ऑफिसमध्ये कोणते हिवाळ्यातील कपडे वापरून पाहू शकता



### विंटर वेअर लाँग कोट

ऑफिससाठी विंटर वेअर लाँग कोट स्टायलिश आहे. हे कोट ऑफिससाठीही एकदम परफेक्ट दिसतात. तुम्ही तुमच्या जीन्स, ट्राउझर्स साडीसोबत ओव्हरकोट किंवा लांब कोट देखील घालू शकता. तुम्ही कोट खरेदी करताना डार्क रंग निवडावे. यामध्ये काळा, नेव्ही ब्लू किंवा गडद राखाडी असे रंग कोणत्याही ड्रेसवर उठून दिसतील.

### ब्लेझर

हिवाळ्यात ऑफिससाठी क्लासी लूक ट्राय करणार असाल., तर तुम्ही ड्रेसवर ब्लेझर घालू शकता. त्यावर तुम्ही हायनेक किंवा विंक पुलओव्हर स्टाईल करू शकता. त्यासोबत जीन्स किंवा ट्राउझर्स छान दिसतील. बोल्ड लूकसाठी तुम्ही त्यासोबत लेदरचे बूट ट्राय करू शकता. तुम्ही हे ब्लेजर साडी, शॉर्ट ड्रेस यावरही मॅच करू शकता.

### ट्रेंडी कफ्तान्स

वूलन कफ्तान्सची फॅशन पुन्हा आली आहे. ती शाल आणि स्वेटर म्हणून वापरू शकते. हे इंडियन आणि वेस्टर्न अशा दोन्ही स्टाइलवर चांगले दिसते. जीन्स, साडी, सूट या सगळ्यांसोबत तुम्ही त्यावर कफ्तान्स वापरू शकता.

### वूलन लाँग शर्ट

जर तुम्हाला सगळ्यात हटके लूक हवा असेल तर तुम्ही तुमच्या हिवाळ्यातील ऑफिस लूकमध्ये वूलन लाँग शर्टचा समावेश करू शकता. तुम्ही वूलनच्या लाँग शर्टवर ब्लॅक जीन्स आणि त्यावर फॅन्सी बूट घालू शकता.

# स्टायलिंगचा हिवाळी मोड ऑन! ग्लॅमरस लुकसाठीचे फॅशन ट्रेंड!

**फॅशन ही ऋतूनुसार बदलत असते. हिवाळ्यात लोकरीच्या कपड्यांना फार मागणी असते. या ऋतूत फॅशनप्रेमींना स्टायलिंग करण्यासाठी असंख्य पर्याय उपलब्ध असतात. हल्ली लोकरीच्या कपड्यांमध्ये नवनवीन पर्याय पाहायला मिळतायत. कॅज्युअल वेअर्ससाठी पुलोवर्स, रिब्ड, नायटेड फॅब्रिकच्या कपड्यांना पसंती दिली जाते. तुम्ही जर हट के लुकचे चाहते असाल तर हिवाळ्यातले फॅशन ट्रेंड्स नक्की फॉलो करा**

- पुलोव्हर्स आणतील लुक : सध्या तरुणींमध्ये पुलोव्हर पॅटर्नची प्रचंड क्रेझ पाहायला मिळतेय. पुलोव्हर्सचा फायदा म्हणजे हे कपडे तुम्ही कोणत्याही ऋतूत आरामात घालू शकता. पुलोव्हर टॉप्स वर्षानुवर्षे टिकतात. शिवाय, ते खिशाला परवडणाऱ्या किंमतीत उपलब्ध असतात. या पॅटर्नमध्ये असणारे भन्नाट डिझाइन्स आणि रंग तरुणींना आकर्षित करत आहेत. तरुणांमध्येही पुलोव्हर्सची फॅशन जोमात आहे. शिमर लुक असणारे पुलोव्हर टॉप्स तरुणींना कमालीची भुरळ घालत आहेत. को-ऑर्ड पुलोव्हर्सची सध्या चलती पाहायला मिळतेय. फुल स्लीव्हज, क्रॉप, क्रॉप टॉप, कॅमी, टॅंक, पिप्लम, ब्लाउज टॉप यामध्ये पुलोव्हर पॅटर्न पसंत केलं जात आहे.
- ट्रेंडी स्वेट टॉप्स : हिवाळा आणि स्वेट टॉप्स हे समीकरण जुनं आहे. पण, बाजारात सध्या स्वेट टॉप्समध्ये स्टायलिश पर्याय दिसतायत. पूर्वी स्वेटर केवळ हिवाळ्यापुरतंच मर्यादित होते. पण, आता कॅज्युअल आणि पार्टीवेअर्ससाठीसुद्धा स्वेट टॉप्सना पसंती दिली जातेय. विशेषतः क्रॉप टॉप्स तरुणींचं लक्ष वेधून घेतायत. स्वेट टॉप्समध्ये फर पॅटर्नला प्रचंड मागणी आहे. टोपी स्टायलिंगमध्ये भर घालते. सध्या ट्रॅक सूट्सची चलती पाहायला मिळतेय.
- हट के नेक-स्लीव्हज : फॅशन करताना व्यक्तिमत्त्वाला शोभेल अशा नेक पॅटर्नची निवड करणं अत्यंत महत्त्वाचं मानलं जातं. रिब्ड टॉप्स आणि टर्टल नेक म्हणजेच हाय नेक यांचं गणित उत्तम जुळतं. टर्टल नेकवर छानसं नेकपिस तुमच्या लुकला चार चांद लावेल. विंटर कलेक्शन टॉप्समध्ये भरपूर प्रकारचे नेक आणि स्लीव्हज डिझाइन्स बाजारात सहजरित्या उपलब्ध होतात. नेकमध्ये वी, ऑफ शोल्डर, कॉलर तर स्लीव्हजमध्ये बलून, कोल्ड शोल्डर, पफ स्लीव्हजना पसंत केलं जातं.
- स्कार्फ दिसेल शोभून : परफेक्ट विंटर लुक करताना स्कार्फला विसरून कसं चालेल? साधारण कपड्यांनाही स्टायलिश आणि हट के लुक देण्याचं काम स्कार्फ करतो. फॅशन जगतात स्कार्फला भरपूर महत्त्व आहे. स्कार्फमुळे तुम्ही आकर्षक तर दिसताच. शिवाय, स्कार्फमुळे नेकपिस किंवा श्रग परिधान करण्याचीही गरज भासत नाही. हिवाळ्यात लोकरीच्या टोपीचीही क्रेझ पहायला मिळते. कारण स्कार्फ गळ्यासोबतच कानाभोवती गुंडाळण्याचा पर्याय असतो. तुमच्या आऊटफिटनुसार स्कार्फची निवड करा. तुमच्या कपाटात किमान एक तरी मफलर किंवा लोकरीचा स्कार्फ असणं गरजेचं आहे, असं स्टायलिस्ट सांगतात.
- जॅकेट्स भारी : फॅशनप्रेमींना कायम भुरळ घालणारा प्रकार म्हणजे जॅकेट. जॅकेट तुमचं व्यक्तिमत्त्व खुलवतं. हिवाळ्यात परफेक्ट विंटर लुक पाहिजे असेल तर पुलोव्हर किंवा रिब्ड पॅटर्नच्या जॅकेट्सची निवड अचूक ठरेल. तरुणांमध्ये झिपर्सची चलती असते. हिवाळ्यात घराबाहेर पडताना हलकंफुलकं जॅकेट तुमच्या सौंदर्याला नक्कीच चार चांद लावेल. तुमच्या पेहरावावर शोभेल अशा जॅकेटची निवड करावी.
- ॲक्सेसरीज फॅशन : केवळ पेहरावातच नाही तर ॲक्सेसरीजमध्येसुद्धा विंटर फॅशनची सरशी पाहायला मिळतेय. बाजारात लोकरीच्या धाग्यांनी विणून तयार केलेले चोकर लक्ष वेधून घेतायत. काही टॉप्ससोबत मॅचिंग चोकर मिळतं. या ऋतूसाठी मुलायम आणि कम्फर्टेबल चपलांची गरज असते. आजकाल फर सॅंडल्सना पसंती मिळतेय. लोकर किंवा ब्रेडेड बॅग्सचा पर्यायही निवडू शकता. शिवाय, रंगबेरंगी सुतळीच्या बॅग्सही आकर्षक दिसतात.

## शॉर्ट न्यूज

### लाडक्या बहिणी आ. संग्राम भैय्याच्या पाठीशी

**नगर :** शहरामध्ये गेल्या दहा वर्षात आमदारकी भूषवितांना आ. संग्रामभैय्या जगताप यांनी माता-भगिनींच्या सुख-दु:खाची समरस होत निर्माण केलेल्या आपलेपणामुळे स्त्री शक्तीची ताकद त्यांच्या पाठीशी उभी राहत असल्याचे दिसून येत आहे. विधानसभा निवडणुक प्रचारासाठी शहरात सुरू असलेल्या प्रचार फेऱ्यांमध्ये आ. संग्रामभैय्या जगताप आल्याचे पाहून त्यांचे स्वागत करण्याकरिता स्वयंस्फूर्तीने पुढे येणाऱ्या भगिनींची लक्षणीय संख्या उत्साहवर्धक आहे.

### महिलांना ३ हजार रुपयांसह सुरक्षितता देणार

**संगमनेर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात कायम महिलांचा सन्मान झाला आहे. मात्र मागील अडीच वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये महिला असुरक्षित असून महायुती सरकार फक्त निवडणुकीसाठी खोटे बोलत आहे. याउलट महाविकास आघाडी सरकार महिलांना ३ हजार रुपये महिन्यासह सुरक्षितता देणार असल्याने सर्व महिलांनी महाविकास आघाडीच्याच पाठिशी उभे राहावे, असे आवाहन डॉ. जयश्री थोरात यांनी केले.

### पाथर्डी तालुक्यातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लागणार

**पाथर्डी :** हा जिराईत तालुका असून पावसाच्या पाण्यावर शेती अवलंबून आहे त्यामुळे शेतकऱ्यांना विविध संकटाला सामोरे जावे लागते शेतकऱ्यांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न व दूध धंदा, शेती सिंचनाखाली आणण्यासाठी वांबोरी चारी टप्पा एक व दोन मार्गी लागावा त्यासाठी प्रयत्न केले. आता लवकरच टप्पा दोन चे काम सुरू होणार असून पाथर्डी तालुक्यातील तलाव भरण्याचे काम होणार आहे. वांबुरी टप्पा दोन पाथर्डी तालुक्यातील गावांसाठी वरदान ठरणार आहे. विकासाची कामे कोणी केली हे जनता ठरवणार आहे.

### कर्डिलेंनी जिल्हा बँक अडचणीत आणली

**संगमनेर :** सहकार क्षेत्र डबघाईला आणणाऱ्या शिवाजी कर्डिले यांनी दुसऱ्यांवर सहकाराबाबत आरोप करण्यापेक्षा जिल्हा बँकेची काय अवस्था झाली आहे, ते पाहावे. अकारण आरोप करू नयेत, असा इशारा आमदार प्राजक्त तनपुरे यांनी दिला. तनपुरे मंगळवारी (दि. १२) डिग्रस, मुळा डॅम, वरवंडी, कोंबडवाडी, बाभूळगाव, धामोरी खुर्द, धामोरी बुद्रुक, खडांबे खुर्द, खडांबे बुद्रुक, गुंजाळे कात्रड येथे दोऱ्यावर हात यावेळी ते वरवंडी येथे बोलत होते. ते म्हणाले, जिल्हा बँकेचा सीडी रेशो बिघडला आहे. कर्ज वाटपामध्ये अनियमितता असल्याची चर्चा आहे.

### आ.रोहित पवार यांचा भाजपवर निशाणा

**जामखेड :** महाविकास आघाडीचे १७० पर्यंत उमेदवार निवडून येणार आहेत. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमित शाह या दोघांच्या जास्त सभा झाल्या, तर आमचे दोनशेच्या पुढे आमदार निवडून येतील आणि मतदार व्याजासकट तुम्हाला उत्तर देतील; असं आमदार रोहित पवार यांनी म्हणत भाजपवर निशाणा साधला आहे. विधानसभेच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत-जामखेड मतदारसंघातील जामखेड येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार रोहित पवार यांची प्रचार सभा झाली. या सभेत बोलताना रोहित पवार यांनी भाजपवर निशाणा साधला आहे.

# राणीताईंच्या राजयोगाचे विरोधकांना आव्हान!

## विजयाचा रथ रोखण्यात प्रतिस्पर्ध्यांसाठी अवघड

पारनेर : नाना करंजुले

**पारनेर नगर विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून राणीताई लंके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्या राजकारणात व समाजकारणात नवख्या नसून गेल्या दीड दशकांपासून कार्यरत आहे. पंचायत समिती सदस्य, उपसभापती, जिल्हा परिषदेत प्रतिनिधित्व करत असताना स्थायी समितीच्या त्या सदस्य होत्या. त्यांचा राजकीय आलेख सातत्याने वर गेला आहे. त्यामुळे त्यांच्या राजयोगाचे विरोधकांसमोर मोठे आव्हान असणार आहे. राणीताई लंके यांचा विजय रथ रोखणे प्रतिस्पर्ध्यांसाठी अवघड असल्याचे चित्र आहे.**

पारनेर तालुक्यातील हंगा या ठिकाणी राहणाऱ्या सर्वसामान्य लंके कुटुंबीयांनी अहमदनगर जिल्ह्यातील प्रस्थापित राजकारणाची मक्तेदारी मोडीत काढली आहे. एका शिक्षकाच्या मुलाने पाच वर्षांमध्ये दोन दिग्गजांना अनुक्रमे विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत पराभवाची धूळ चारत इतिहास घडवला. त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती सुद्धा राजकीय क्षेत्रामध्ये आपले पाय घट्ट रोवू शकतात याचे उत्तम आणि ज्वलंत उदाहरण म्हणजे खासदार नीलेश लंके होय. त्यांच्या अर्धांगिनी या त्यांची कायम सावली बनून राहिल्या ;कर्तुत्वाची पाऊलवाट म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातून राणीताई नीलेश लंके या आपले नशीब आजमावत आहेत. तुतारी चिन्हावर ते निवडणूक लढवत आहेत. मेरिट बेसवर त्यांना ही उमेदवारी पक्षाने दिली आहे. फक्त निवडणुकीच्या उमेदवारीकरिता त्या पुढे आल्या नसून गेल्या पंधरा वर्षापासून राजकारण व समाजकारणात सक्रिय आहेत.

पंचायत समितीच्या सदस्य म्हणून त्यांनी अत्यंत चांगले काम केले. इतकेच नाही तर पारनेर तालुका पंचायत समितीचे उपसभापती म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. त्यानंतर राणीताई लंके या जिल्हा परिषद सुपा गटातून निवडणुकीला सामोरे गेल्या. प्रतिस्पर्धी उमेदवाराला पराभूत करून जिल्हा परिषदेच्या सदस्य झाल्या. आव्हानाला आव्हान करून सामोरे जात असताना त्यांचा चढता आलेख खरोखर दखलपात्र म्हणावा लागेल. त्यानंतर जिल्हा परिषद स्थायी समितीच्या सदस्य पदाकरता सुद्धा त्या निवडणुकीत उतरल्या. पुरेसे संख्याबळ नसतानाही राणीताई या ठिकाणी सुद्धा यशस्वी ठरल्या. दरम्यान त्यांचा विजय रथ सुरूच राहिला. या निवडणुकीत आणि प्रतिस्पर्धी उमेदवारांसमोर मोठे आव्हान निर्माण केले आहे. विशेष म्हणजे प्रचारात सुद्धा राणीताई या आघाडीवर आहेत. त्यांचा विजय निश्चित असून फक्त लीड किती याबाबतच चर्चा सुरू असल्याची प्रतिक्रिया नीलेश लंके प्रतिष्ठानचे कार्यकर्ते गणेश करंजुले यांनी दिली.



**नामांकित कंपनीत अभियंता म्हणून नोकरी करत असताना खासदार नीलेश लंके आणि राणीताई लंके यांची सर्वसामान्यांची असणारी बांधिलकी खऱ्या अर्थाने मला भावली. खासदार महोदयांबरोबरच राणीताईनी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये अतिशय भरीव कामे केले आहेत. केवळ पारनेर नगरच नव्हे तर अहिल्यानगर दक्षिण आणि पूर्ण जिल्ह्यात त्या फिरतात. अर्थ टू डाऊन असे हे दांम्पत्य आहे. त्यामुळे यश आणि विजय त्यांना कदापिही दूर करू शकत नाही. राजयोग आहेच पण त्याग ,प्रामाणिकपणा, आपलेपणाची भावना, संवेदनशीलता या सर्व गोष्टींच्या बळावर राणीताई लंके या विधानसभेत जाणार ही काळ्या दगडावरील पांढरी रेघ आहे.**

**सतीश भालेकर**
निलेश लंके प्रतिष्ठान, पारनेर

### नशिबासोबत परिश्रम अन् मेहनतीचा स्नेह!

**माजी जिल्हा परिषद सदस्य आणि पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार राणीताई लंके यांच्या राजयोगाची चर्चा सातत्याने होते. त्यांचे नशीब तितके महत्त्वाचे आहे तितक्या दुपटीने राणीताई खासदार नीलेश लंके यांच्या कर्तुत्वाची सातत्याने सावली बनून राहिल्या. २४ तास ३६५ दिवस लोकसभेसाठी त्यांनी सुद्धा स्वतःला वाहून घेतले आहे. शंभर ते दीडशे लग्न एका दिवशी अटेंड करायचे. त्याचबरोबर खासदारांच्या पश्चात इतर कार्यक्रमांना सुद्धा हजेरी लावून संबंधितांना शुभेच्छा द्यायच्या. सर्वसामान्यांच्या अडीअडचणीमध्ये सहभागी होऊन त्यांना आधार आणि मदतीचा हात द्यायचा. कुटुंब आणि मुलांकडे लक्ष देऊन या सर्व गोष्टी सांभाळण्यासाठी त्यांना मोठी कसरत करावी लागते.**

### खा. लंके यांच्या कार्याची साथ!

**खासदार नीलेश लंके आणि जनसामान्य एक वेगळे नाते आहे. स्वतःचा जीव धोक्यात घालून हजारो लोकांचे जीव वाचवणाऱ्या खा .लंके यांची लोकप्रियता शिखरावर पोहोचली आहे. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी केलेली कामे त्यांची कार्यक्षमता ,कार्यतत्परता आणि कर्तव्यदक्षता तसेच साधेपण आणि लोकांच्या हृदयात निर्माण केलेले स्थान या सर्व गोष्टी या विधानसभा निवडणुकीमध्ये उमेदवार म्हणून राणीताई लंके यांना प्लस पॉइंट ठरणार आहेत.**

# २४ वर्षांच्या जुन्या आठवणींना मिळाला नवा उजाळा !

## न्यू इंग्लिश स्कूलमध्ये माजी विद्यार्थी मेळावा संपन्न



पारनेर : प्रतिनिधी

**त्या काळात शिक्षणासाठी संघर्ष करावा लागत एकच गणवेश घालून विद्यार्थी शाळेत येत अतिशय गरीब कुटुंबातील विद्यार्थी असल्याने त्याची जाण आजही सर्वांच्या चेहऱ्यावर आहे. २४ वर्षांपूर्वी केलेली मेहनत व शिक्षकांनी केलेले योग्य मार्गदर्शन यामुळे सर्वच माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात चांगल्या पदावर कार्यरत असल्याने श्रेयाचे फलित झाल्याचे प्रतिपादन माजी प्राचार्य गणपतराव आंबुले यांनी केले.**

यावेळी व्यासपीठावर न्यू इंग्लिश स्कूल पारनेरचे प्राचार्य अर्जुन भुजबळ, अच्युतराव जगदाळे, जयसिंगराव नरवडे पोपटराव घोडके मुकुंद जासूद नंदकुमार कोल्हे धोंडीभाऊ तांबे सिंधुबाई कोल्हे शुभा मुळे मनीषा जगदाळे रवींद्र मते आदी उपस्थित होते.सन १९९९-२००० इयत्ता १० च्या बॅचचा माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मिळावा न्यू इंग्लिश स्कूल पारनेर येथे आयोजित करण्यात आला यावेळी आंबुले बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले खडतर परिस्थितीत तुम्हाला शिक्षण देणारे आई वडील आठवा आज हे जे तुम्हाला प्राप्त झाले आहे ते त्यांच्या पुण्याईवर व त्यांनी केलेल्या कष्टावर झाले आहे. तुम्ही आज जे सर्वजण विविध क्षेत्रात चांगल्या उद्योग व्यवसायात नोकरीत कार्यरत आहात त्याचे सर्व श्रेय आई वडील व तुम्हाला घडवणाऱ्या सर्व शिक्षकांचे आहे. त्यामुळे आई-वडिलांची शेवटपर्यंत सेवा करा असा सल्ला त्यांनी दिला. माजी विद्यार्थ्यांनी न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी ४० हजार रुपयाची अद्यावत साऊंड सिस्टीम भेट म्हणून दिली.

यावेळी माजी विद्यार्थ्यांमध्ये शशिकांत भालेकर, संतोष सोबले, दिलीप औटी, संजय पठारे, सुहास आबुले , मारुती औटी, मुरलीधर कावरे, निलेश गांधी, सचिन गांधी, संतोष गंधाडे, रूपाली औटी, वैजंता चौधरी, संदीप पुजारी, मीनाक्षी ठाणगे, ज्ञानेश्वर मस्के, अश्विनी गणाचार्य, योगिता खेडेकर, मंगल औटी, सुधाकर कानडे, सुरेश औटी, अभिजीत शिंदे, प्रकाश पठारे, आशिष औटी, आप्पा भगत, नीता वाबळे, सविता ठोंबरे, अकील अत्तर, अजय घोंगडे, अनिल औटी, अश्विनी भिसे,वैशाली गाडे, स्मिता सोनवणे, भागवत गाडेकर, निलेश गाडगे, संदीप गायकवाड, प्रवीण साळवे,किशोर शहाणे प्रमिला ठोंबरे कौशल्या थोरात प्रवीण साळवे आदी उपस्थित होते.

### पुन्हा बाकावर बसल्याचा आनंद

**माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत एकमेकांची आपुलकीने चौकशी केली २४ वर्षानंतर पुन्हा एकदा शाळेच्या बाकावर बसल्याचा अनेकांचे चेहऱ्यावर आनंद ओसांडून वाहत होता. शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. गुरुजनांचा आशीर्वाद घेऊन त्यांची आस्थेने माजी विद्यार्थ्यांनी विचारपूस केली.**

### माजी विद्यार्थी शाळेचे रत्न

**आयुष्यात अनेक शिक्षक आपणाला शिकवणारे भेटतात मात्र घडवणारे शिक्षक देखील असायला पाहिजे त्यावेळीचे शिक्षक तुम्हाला घडवणारे भेटले त्यांनी हे विद्यालय शिखरावर पोचवले माजी विद्यार्थी या शाळेचे रत्न आहात तुम्हाला या शाळेने घडवले. असल्याचे मत न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य अर्जुन भुजबळ यांनी व्यक्त केले.**

# काशिनाथ दातेंच्या प्रचारात संदीप वराळ सक्रिय

## निघोजच्या प्रभाग सहामध्ये घरोघरी प्रचार



निघोज : प्रतिनिधी

**निघोज आणि परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार पक्षाचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचाराचा जोरदार शुभारंभ करण्यात आला. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी प्रभाग क्रमांक सहामध्ये घरोघर जाऊन दाते यांच्या प्रचाराचा जोरदार शुभारंभ केला आहे.**

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर दुसऱ्या दिवशी निघोज येथील पुष्कर लॉन्स येथे दाते यांच्या प्रचाराचे नियोजन करण्यासाठी बैठक घेण्यात आली होती यावेळी भाजपचे तालुक्यातील सर्व पदाधिकारी तसेच निघोज येथील संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, पारनेर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक ॲड बाळासाहेब लामखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रोहिदास लामखडे यांच्यासहीत शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. मात्र मध्यंतरी प्रचारकार्यात थोडी मरगळ आली होती. सचिन पाटील वराळ यांना प्रवरेचे आदेश न आल्याने त्यांचे कार्यकर्ते प्रचारात सक्रीय झाले नव्हते. मात्र बुधवार दि १३ रोजी निघोज येथील संत सेना सभागृहात सचिन पाटील वराळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी प्रचाराचे नियोजन करण्यात आले.

प्रभाग क्रमांक सहामधील विशेष करुन लाळगे वस्ती, तनपुरे वस्ती या ठिकाणी प्रमुख शेकडो कार्यकर्त्यांनी सचिन पाटील वराळ यांच्या समवेत घरोघर जाऊन दाते यांचा प्रचार करीत महायुती सरकारची भुमिका व त्यांनी दिलेल्या योजनांची माहिती दिली. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी यावेळी सांगितले की राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार काशिनाथ दाते गेली चाळीस वर्षे राजकारणात सक्रिय असून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाच्या पदाच्या माध्यमातून चांगले विकासाचे कामे केली असून जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समितीचे सभापती म्हणून काम करताना त्यांनी पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघात शेकडो कोटींची विकासकामे केली आहेत. राज्यात महायुतीची सत्ता आल्यानंतर खऱ्या अर्थाने दाते सर यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे होणार असून दाते सर यांना निवडून देण्याचे आवाहन सचिन पाटील वराळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

# एमआयडीसीत चोरी करणारी टोळी जेरबंद

## चौघांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल

नगर : प्रतिनिधी

**एमआयडीसी परिसरात चोरी करणारी टोळी जेरबंद करण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. चौघांना अटक करण्यात आले असून त्यांच्या ताब्यातून दोन दुचाकी व कॉपर धातूची केबल असा १ लाख १ हजार ७५० रूपये किंमतीच्या मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अजिनाथ नानासाहेब आंधळे (वय ३६, रा. चांदा, ता. नेवासे), अजय सतीश साळवे (वय ३४, रा. खोसपुरी, ता. नगर), बादशाहा अब्दुल खान (वय २९, रा. आंधळे-चौरेनगर, नवनागापूर), साहिल अकबर खान (वय ३३, रा. साईराजनगर) या चौघांविरूद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली गुरूवारी (ता.७) रात्री गस्त सुरू होती. हॉगनस कंपनी ते अग्निशामक कार्यालयाजवळ चौघे संशयितरित्या मिळून आले. त्यांच्याकडे दोन दुचाकी व कॉपर धातुची ३ किलो ५०० ग्रॅमची वायर मिळून आली. दुचाकीचे कागदपत्रांची चौकशी केली असता उडवा-उडवीची उत्तरे देऊ लागले. कॉपर धातूच्या केबलबद्दल समाधानकारक उत्तरे देता आले नाहीत. पोलिसांनी केलेल्या चौकशी दुचाकी आणि मुद्देमाल चोरीचा असल्याचे निष्पन्न झाले. पोलीस अंमलदार सुरेश सानप यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# केंद्राप्रमाणेच राज्यातही महायुतीचेच सरकार येणार!

## ■ काशिनाथ दाते यांचा आत्मविश्वास ■ परिवर्तनाच्या लढाईत सहभागी होण्याचे आवाहन ■ नारायणव्हाण परिसरातील नागरीकांशी संवाद




**नारायणव्हाण : प्रतिनिधी**

**राज्याच्या सर्वांगिण विकासासाठी केंद्रातील सरकारच्या विचारांचेच सरकार राज्यात पुन्हा सत्तेवर येणार असून पारनेर-नगर मतदारसंघात मी महायुतीचा उमेदवार असून मतदारांनी आपणास पाठबळ देउन परिवर्तनाच्या लढाईत सहभागी होण्याचे आवाहन महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी केले.**

दाते यांच्या प्रचारार्थ नारायणगव्हाण परिसरात दाते यांनी नागरीकांशी संवाद साधला. विविध ठिकाणी नागरीकांकडून दाते यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना दाते म्हणाले, तालुक्यातील बेरोजगारी वाढली आहे. स्थानिक युवकांना एमआयडीसीमध्ये रोजगार मिळाला पाहिजे. आपल्याला सुसंस्कृत तालुका घडवायचा असून त्यासाठीच माझी उमेदवारी आहे. राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर त्यांनी घेतलेले निर्णय तुमच्यासामोर आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण हा लोकप्रिय निर्णय ठरल्याचे दाते म्हणाले.

नागरीकांशी संवाद साधताना दाते पुढे म्हणाले, थोडा विचार करा आणि कधी आपल्या घरातील महिलेचे खाते उघडले का ? कधी महिलांच्या खात्यावर पैसे भरले का ? जे काम आपण केले नाही ते महायुती सरकारने करून दाखविले आहे. या योजनेचे पैसे देताना तालुक्यात महिलांची ७० हजार खाती उघडली गेली. त्यांच्या खात्यावर दिवाळीपूर्वी साडेसात हजार रूपये जमा करण्यात आले. हे पैसे कधी काढायचे याचा अधिकार माझ्या बहिणींना दिला. महायुतीचा उमेदवार म्हणून माझ्या लाडक्या बहिणी मला मतदान केल्याशिवाय राहणार नाहीत असा विश्वास दाते यांनी व्यक्त केला.

महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या कृषि पंपाचे वीज बिल माफ केले असून ही योजना पुढील पाच वर्षे असणार आहे. दुधाला सात लिटर अनुदान देण्यात आले तर एक रूपयांत पीक विमाही दिला. मुलींना पहिलीपासून पदवीपर्यंत मोफत शिक्षण देत असे अनेक चांगले निर्णय या सरकारने घेतले असल्याने राज्यात महायुतीचेच सरकार येणार असल्याचा विश्वास दाते यांनी व्यक्त केला.

### दाते सर योग्य उमेदवार

**एका बाजूला पुढारी आणि सर्वसामान्य जनता एका बाजूला असे चित्र तालुक्यात आहे. न्युरो सर्जन डॉ. सुजय विखे यांचा पराभव मनाला चटका लावणारा आहे. लाडक्या बहिणींना सरकारने दिवाळीपूव भाऊबीज दिली, हा निर्णय चांगला आहे. काशिनाथ दाते यांच्याकडे प्रशासनाचा अनुभव असल्याने ते योग्य उमेदवार आहेत.**

**सुरेश बोऱ्हुडे**
मा. सरपंच, नारायणव्हाण

### काशिनाथ दाते यांना साथ द्या

**गावागावांत भांडणे लावण्यात आली. सरपंचावर अविश्वास आणणे, सोसायटी निवडणूकीत लक्ष घालणे, तरूणांना रोजगार नाही असे प्रश्न तालुक्यात आहेत. या प्रश्नांची तड लावण्यासाठी विचारपूर्वक मतदान करा. हा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसला मानणारा तालुका असल्याने काशिनाथ दाते यांना साथ द्या.**

**अशोक कडले**

यावेळी भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, मा. जिल्हाध्यक्ष प्रशांत गायकवाड, मा. सभापती गणेश शेळके, भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, सुषमा रावडे, प्रमोद घनवट, सुनील थोरात, सरपंच मनोज मुंगसे, लहू भालेकर, सरपंच संतोष शेळके, चेअरमन रामचंद्र शेळके, राजू उबाळे, शुभम गाडेकर आदी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी शिक्षक सेलच्या जिल्हा उपाध्यक्षपदी काळे

## खा. नीलेश लंके यांनी प्रदान केले नियुक्तीपत्र



■ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शिक्षक सेलच्या जिल्हा उपाध्यक्ष म्हणून प्रतापराव काळे यांना खा. नीलेश लंके यांनी नियुक्तीचे पत्र प्रदान केले.

**पारनेर : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या शिक्षक सेलच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी अस्तगांव सारोळा येथील प्रतापराव बन्सीराव काळे यांची निवड करण्यात आली. खा. नीलेश लंके यांनी काळे यांना नियुक्तीचे पत्र प्रदान केले.**

काळे यांनी पुरोगामी विचारांचा पुरस्कार करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी योगदान दिले आहे. या योगदानाची दखल घेऊन काळे यांची पक्षाच्या शिक्षक सेलच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबाजी तरटे यांनी सांगितले.

समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचे विचार, पक्षाची ध्येय धोरणे सर्व समाज घटकांपर्यंत पोहचवून पक्ष संघटनेच्या वाढीसाठी आपण कार्यरत रहाल असा विश्वास शिक्षक सेलचे जिल्हाध्यक्ष कर्ण रोकडे यांनी दिलेल्या नियुक्तीपत्रात व्यक्त करण्यात आला आहे.

खा. नीलेश लंके यांच्या शिफारशीनुसार आपणावर टाकलेली जबाबदारी आपण निष्ठेने पार पाडणार असून पक्षाची ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे प्रतापराव काळे यांनी सांगितले.अस्तगांवच्या सरपंच रेश्मा काळे, जालिंदर काळे, सुरेश काळे, वैभव काळे, अलका नानेकर, संध्या काळे, दत्तात्रेय येणारे, ज्ञानदेव काळे यांनी प्रतापराव काळे यांचे अभिनंदन केले.

### काळे संघटनेत योगदान देतील

**राष्ट्रवादी शिक्षक सेलचे काम नगर जिल्हयात उत्तम असून विविध पदाधिकारी पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोचविण्याचे काम उत्तमरित्या करत आहेत. शिक्षकांच्या विविध समस्या दुर करण्यासाठी सेलचे पदाधिकारी सतत कार्यरत असून आता प्रतापराव काळे हे देखील सेलचे काम पुढे नेण्यासाठी योगदान देतील.**

**खा. नीलेश लंके**

# भिमशक्ती संघटनेचा राणी लंके यांना पाठिंबा

## खा. नीलेश लंके यांच्याकडे सुपूर्द केले पाठिंब्याचे पत्र

**भाळवणी : प्रतिनिधी**

**भिमशक्ती सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा.मंत्री चंद्रकांत हांडोरे यांच्या आदेशानुसार विधानसभा निवडणूकीतील महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांना भिमशक्ती संघटनेचा बिनशर्त पाठिंबा देण्यात आला. संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रल्हाद शिंदे यांनी खा. नीलेश लंके यांच्याकडे पाठिंब्याचे पत्र सुपूर्द केले.**



शिंदे यांनी खा. नीलेश लंके यांना दिलेल्या पाठिंब्याच्या पत्रात नमुद करण्यात आले आहे की, मागासवर्गीयांचे आरक्षण नष्ट करू पाहणाऱ्या व मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची पदोन्नती रोखणार्या, संविधान विरोधी जातीयवाद्यांना नेस्तनाबुत करण्यासाठी भिमशक्ती संघटना मैदानात उतरली असून महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी काम करणार असल्याचे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

सर्व बहुजन समाजाने महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी नीलेश लंके यांना मतदान करून मोठया मताधिक्क्याने विजयी करण्याचे आवाहन भिमशक्ती संघटनेच्या वतीने करण्यात येत असल्याचे पत्रकात नमुद करण्यात आले आहे.

# विविध गावांमधून तनपुरेंना वाढते पाठबळ

## डिग्रस, खडांबे बुद्रुक, धारवाडीमध्ये तरूणांचा राष्ट्रवादीत प्रवेश



■ राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघातील विविध गावांतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आ. प्राजक्त तनपुरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.

**राहुरी : प्रतिनिधी**

**राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आ. प्राजक्त तनपुरे यांना विविध गावांमधून पाठबळ वाढत असून डिग्रस, खडांबे बुद्रुक, धारवाडीमध्ये विविध पदाधिकारी तसेच युवा कार्यकर्त्यांनी आ. प्राजक्त तनपुरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.**

डिग्रस येथे विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे सदस्य राहुल भिंगारदे, डिग्रस ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच राजेंद्र आघाव यांनी आ. प्राजक्त तनपुरे यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी उपसरपंच रावसाहेब पवार, पंचायत समितीचे मा. सदस्य सचिन भिंगारदे, बाजार समितीचे संचालक मधुकर पवार, ग्रामपंचायत सदस्य अनिल शिदे, ललित घुले, राजू कसबे, प्रतिभा कोकाटे, सुभाष बेलकर, संदीप गावडे, प्रवीण भिंगारदे, विष्णू बर्डे, अनिल पवार, वैशाली टेके आदी यावेळी उपस्थित होते.

खडांबे बुद्रुक येथील मा. सरपंच यशवंत तथा मुन्नाशेठ ताकटे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्यांचा आ. प्राजक्त तनपुरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी सदस्य राहुल पवार, रोहित पवार, किरण कलापुरे,आधार पठाण यांचा प्रवेश केलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये समावेश आहे. यावेळी सरपंच कैलास पवार, विलास कलापुरे, बाळासाहेब जठार, बाळासाहेब लटके, आदीनाथ धाकटे आदी उपस्थित होते.

पाथर्डी तालुक्यातील धारवाडी येथील मा. सरपंच युवा नेते बापूसाहेब गोर, व नवनाथ रणसिंग यांनी आ. प्राजक्त तनपुरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी धारवाडीचे सरपंच भीमराज सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष अंबादास डमाळे, युवा नेते राजेंद्र दगडखैर, राजेंद्र गर्जे आदी उपस्थित होते.

### पदाधिकाऱ्यांचा सन्मान करणार

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केलेल्या मतदारसंघातील विविध पदाधिकारी कार्यकर्ते यांचा पक्षामध्ये योग्य सन्मान करण्यात येउन त्यांना न्याय देण्याची भूमिका घेतली जाईल. नव्या जुन्यांचा मेळ घालून सर्वांच्या समन्वयातून मतदारसंघातील विकास कामांची घोडदौड अशी पुढे सुरू ठेवायची आहे.**

**आ. प्राजक्त तनपुरे**
विधानसभा सदस्य

### पाच वर्षांतील कामांचा प्रभाव

**गेल्या पाच वर्षात आ. प्राजक्त तनपुरे यांनी वीजेच्या प्रश्नाबरोबरच निळवंडे कालवा, वांबोरी चारी तसेच मुळा कालव्यांच्या पाण्याचे योग्य नियोजन करीत इतर विविध विकास कामे मार्गी लावल्याने संपूर्ण मतदारसंघात आ. तनपुरे यांचा प्रभाव दिसून येत आहे. त्यामुळेच विविध गावांचे पदाधिकारी, युवा कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करत असल्याचे चित्र आहे.**

# जगताप परिवाराचे माळी समाजाशी ऋणानुबंध

## सकल माळी समाजाचा आ. संग्राम जगताप यांना पाठिंबा




■ संत सावता क्रांती परिषदेच्या अहिल्यानगर शाखेचा शुभारंभ मा. आ. अरूणकाका जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

**नगर : प्रतिनिधी**

**संत सावता महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे विचार घेउन नगर शहरात माळी समाजाची वाटचाल सुरू आहे. माळी समाजाचे जगताप परिवाराशी वर्षानुवर्षांचे ऋणानुबंध असून त्यामुळेच माळी समाज आमच्या परिवारासोबत नेहमीच उभा असतो. असे प्रतिपादन मा. आमदार अरूणकाका जगताप यांनी केले.**

विधानपरिषदेचे सदस्य आ. योगेश टिळेकर संस्थापित संत सावता क्रांती परिषदेच्या अहिल्यानगर शाखेचा शुभारंभ मा. आ. अरूणकाका जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सकल माळी समाजाच्या वतीने महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांना एकमताने पाठिंबा जाहिर करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले हे होते.

यावेळी बोलताना जगताप म्हणाले, जगताप कुटूंबिय वारकारी संप्रदाय जपत सर्व संत मंडळींच्या तसेच संत सावता महाराजांच्या शिकवणीप्रमाणे नगर शहरात कार्यरत आहे. सारसनगरच्या सावित्रीबाई फुलेनगर प्रवेशदवार कमानीला शासनाचा निधी उपलब्ध होत नसल्याने जगताप परिवाराच्या वतीने स्वखर्चाने प्रवेशद्वार कमानीचे काम सुरू करून ते पुर्णत्वास येत आहे. शहरातील माळी समाजाने आ. संग्राम जगताप यांना पाठिंबा दिल्याने त्यांच्या विजयात मोलाची भर पडणार आहे. माळी समाजाने पाठींबा दिल्याबद्द्ल मी समाजाचा आभारी असल्याचे अरूणकाका जगताप यांनी सांगितले.

यावेळी उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सचिव राजेंद्र पडोळे, मा. नगरसेवक धनंजय जाधव, प्रा. माणिक विधाते, ज्ञानेश्वर रासकर, बाळासाहेब आगरकर, डॉ. रणजीत सत्रे, विनोद पुंड, प्रकाश शिंदे आदींसह माळी समाजातील महिला, नागरीक उपस्थित होते.

आ. संग्राम जगताप यांच्या सहकार्याने सावित्रीबाई फुले नगर नामकरण, महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुर्णाकृती पुतळयास मंजुरी मिळाली असून लवकरच ते पुतळे उभारले जाणार आहेत. विविध उपक्रमांसाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून दोन एकर जागेचा भुखंड देऊन आ. जगताप यांनी समाजास नेहमीच सहकार्य केले आहे. त्यामुळेच या निवडणूकीत आ. जगताप यांच्या पाठशी उभे राहण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला.

### ऐतिहासिक निर्णय

**नगरमध्ये प्रथमच माळी समाजाने बैठक घेऊन विधानसभा निवडणूकीत एखाद्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. २४ तास उपलब्ध असलेल्या आ. संग्राम जगताप यांच्यासारख्या सक्षम उमेदवाराला पाठिंबा देण्याचा समाजाचा निर्णय ऐतिहासिक असून जगताप यांच्यासाठी माळी समाज एकवटला आहे.**

**ज्ञानेश्वर रासकर**

### वर्गमित्र आमदारकीची हॅट्रीक करणार !

**आ. जगताप यांच्याकडे विकासाचे व्हिजन आहे. त्यांनी गेल्या दहा वर्षात शहराच्या विकासासाठी तब्बल ५०० कोटींचा भरीव निधी आणून शहराच्या विकासात मोलाची भर घातली आहे.आपण सर्वांनी मिळून आ. जगताप यांना पुन्हा आमदार करण्यासाठी एकत्रीत काम करू. माझा वर्गमित्र आमदारकीची हॅट्रीक करणार याचा अभिमान आहे.**

**धनंजय जाधव**
मा. नगरसेवक

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. अनुरीता झगडे यांनी तर बाळासाहेब भुजबळ यांनी आभार मानले. यावेळी वसंतराव आगरकर, संतोष गोंधळे, अनिल इवले, मच्छिंद्र बनकर, कॅप्टन सुधीर पुंड, गजानर ससाणे, अशोक आगरकर, प्रकाश इवळे, नीलेश चिपाडे, सुरेश आंबेकर, राहुल रासकर, सुरेश कावळे, अमोल भांबरकर, ब्रिजेश ताठे, दीपक खेडकर,अमित खामकर, दत्ता गाडळकर, भानुदास बनकर, चंद्रकांत पुंड, रोहित पठारे, रोहन डागवाले, गणेश शिंदे, मनोज भुजबळ, कल्याणी गाडळकर, रेणूका पुंड, किरण कोतवाल, सुरेखा कोतवाल, सुरेखा घोलप, रोहिणी बनकर, विजय भांबरकर यांच्यासह माळी समाजातील नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com